# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

Dr. Priya Gedam
Director Students' Development (I/c.)
Mo. No. - 9049474119

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org
Email : director.dsd@unigug.ac.in


पत्र क्र. No.GU/DSW / 156 /2023 Dt: 4/08/2023

**प्रति,**

मा. प्राचार्य
संलग्नित सर्व महाविद्यालये/विभागप्रमूख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग.
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

**विषय : आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धा २०२२–२०२३.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या लेखनगुणांना व सृजनशिलतेला महाविद्यालयीन स्तरावर व्यासपीठ उपलब्ध व्हावे, त्यांच्या लेखन कलेला प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने विद्यापीठाव्दारे आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धेचे आयोजन शैक्षणिक सत्र २०१३–२०१४ पासून सुरु करण्यात आले आहे. सदर वार्षिकांकाच्या प्रकाशनासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांकडून प्राप्त वार्षिकांक शुल्काच्या रकमेतून आपल्या महाविद्यालयात वार्षिकांक प्रकाशित होणे अपेक्षित आहे.

प्रस्तूत स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या वार्षिकांकाला रु. ५,०००/– चे रोख बक्षिस तसेच व्दितीय व तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या वार्षिकांकांना अनुक्रमे रु. ३,०००/– व रु. १,०००/– चे रोख बक्षिस देण्यात येईल. तसेच रु. ५००/– च्या रोख रकमेची प्रत्येक जिल्ह्यातून एक असे २ उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात येतील. सोबत प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देवून पुरस्कृत महाविद्यालयाचा गौरव करण्यात येईल. समान गुण प्राप्त करणाऱ्या वार्षिकांकांना बक्षीस विभागून देण्यात येईल. वार्षिकांकांचे मुल्यांकन व गुणविभागणी खालील नियमांच्या आधारे करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

१. **विद्यार्थ्यांचा सहभाग (गुण – २०) :–** यात फक्त वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी/ विद्यार्थीनींचा सहभाग अपेक्षित आहे. महाविद्यालयांतील सर्व विद्याशाखा आणि वर्ग यांचा सहभाग असावा. लेखन सर्व विद्यार्थ्यांचे प्रतिनिधीभूत असावे.
२. **रचनांचा आशय (गुण – २०) :–** वार्षिकांकात प्रकाशित मजकूर विद्यार्थी/विद्यार्थीनींचा असावा. प्राध्यापकांकडून लेखनाची अपेक्षा नाही. क्वचित लेखन प्रकाशित झालेच तर त्या लेखनाचे मूल्यांकन करण्यात येणार नाही. वार्षिकांकातील लेखन महाविद्यालयात अध्यापन होणाऱ्या भाषेतील असावे मराठी, हिन्दी, इंग्रजी, संस्कृत व उर्दू आदि. गद्य–पद्यात्मक लेखनाचा दर्जा तपासतांना त्यातील संपन्न आशयाचा विचार करण्यात येईल.
३. **रचनांची शैली (गुण – २०) :–** रचनांच्या विषयाची मांडणी शैलीदार असावी. विषय वाचकांपूढे ठेवतांना शैली साधी व सरळ अनलंकृत असावी. अलंकारीक असल्यास कृत्रिम असू नये, तसेच अनुकरण असू नये.
४. **अंकाची निर्मिती (गुण – २०) :–** वार्षिकांकाची निर्मिती चांगली असावी, यात अंकाची एकुण आकर्षकता ठरवितांना खालील चार बाबी विचारार्थ घेण्यात येतील. अ)मुखपृष्ठ ब) छपाई क) बांधणी ड) रचना अथवा मजकूराची मांडणी
५. **संबंधीत शैक्षणिक वर्षाचे संदर्भमान (गुण – १५) :–** वार्षिकांक प्रसिध्द करतांना संबंधित शैक्षणिक वर्षातील महत्वाच्या म्हणजे संस्मरणीय घटना, व्यक्ती, प्रसंग, जन्मशताब्दी व पर्यावरण आदिंची दखल घेतलेली असावी. विषयांची विविधता आणि विशेषता हवी.
६. **वार्षिकांकाचे शिर्षक (गुण – ०५) :–**
संबंधीत शैक्षणिक सत्रात प्रकाशित होणाऱ्या वार्षिकांकात जाहिराती प्रकाशित झालेल्या नसाव्या. ज्या वार्षिकांकात जाहिराती प्रसिध्द केल्या असतील अशा वार्षिकांकाचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही.

तरी आपल्या महाविद्यालयाव्दारे २०२२–२०२३ या शैक्षणिक सत्रात प्रकाशित झालेल्या वार्षिकांकाच्या १० प्रती प्रस्तूत स्पर्धेसाठी दि. १५/०७/२०२३ **पर्यंत** मागविण्यात आलेले होते. मा.कुलगुरूंच्या आदेशान्वये या दिनांकात वाढ करण्यात आलेली असून सदर वार्षिकांक दिनांक १५ ऑगस्ट, २०२३ पर्यंत संचालक विद्यार्थी विकास विभाग गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे कार्यालयात पाठवावे. तसेच दरवर्षी नियमितपणे वार्षिकांक प्रकाशित करावा अशी आपणांस विनंती आहे.

धन्यवाद!

**संचालक**
**विद्यार्थी विकास विभाग**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**